MY कोल्हापूर
पुढारी मंगळवार, ३१ जुलै २०१८ ॥ शहर

# लैंगिक शोषणाबाबत जनजागृती आवश्यक

## शिक्षण सभापती अशोक जाधव यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लहान मुलांचे लैंगिक शोषण ही गंभीर समस्या असून त्याबाबत जनजागृती आवश्यक आहे, असे प्रतिपादन महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण समितीचे सभापती अशोक जाधव यांनी केले.

शिक्षण समिती व महिला व बालकल्याण समितीच्या वतीने शिक्षकांसाठी लैंगिक शोषण समस्येबाबत तसेच लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण अधिनियम कायद्याविषयी पाच दिवसीय विशेष प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी सभापती जाधव बोलत होते. महिला व बालकल्याण समिती सदस्या अ‍ॅड. सुरमंजिरी लाटकर यांच्या पुढाकाराने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. शालेय जीवनात लैंगिकतेविषयी काही किमान गोष्टींची माहिती मुला मुलींना होणे आवश्यक आहे. जेणे करून चुकीच्या व अनैतिक बाबींना प्रतिबंध घालता येऊ शकेल, असे मत प्राथमिक शिक्षण समितीचे प्रशासनाधिकारी शंकर यादव यांनी व्यक्त केले. सोनाली परब, सुविद्या गायकवाड, दीपाली खरात, नीलम खरे, दीपाली कदम, सरोज सालपे, राज नारायण व अमेय कोरगावकर यांच्यामार्फत दिली जाणार आहे. प्रशिक्षणास कार्यक्रम अधिकारी रसुल पाटील, लेखापाल राजीव साळोखे, पर्यवेक्षक विजय माळी, उषा सरदेसाई व शांताराम सुतार, शिक्षक, मुख्याध्यापक उपस्थित होते.